दैनिक

# वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com

संपादक : अजय भांगे

https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक २२२ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Friday 10 April 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 222 • Pages 4 • Rate 4 Rs

### उपमुख्यमंत्री शिंदे पुन्हा दरे गावाच्या दौऱ्यावर

**मुंबई**–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा तीन दिवसांचा सातारा दौरा सुरु झाला असून त्यांच्या दरेगाव भेटीला राजकीय वर्तुळात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. हा दौरा अधिकृतपेक्षा खाजगी असल्याचे सांगितले जात असले तरी, अलीकडील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या भेटीकडे राजकीय नजरेने पाहिले जात आहे.सातारा जिल्हा परिषदेच्या नुकत्याच झालेल्या अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवडीत मोठे राजकीय नाट्य रंगले होते. या निवडीदरम्यान शिवसेना आणि भाजपमधील अंतर्गत मतभेद चव्हाट्यावर आले होते. त्यातच नवनिर्वाचित अध्यक्षांच्या जात प्रमाणपत्रावरून सुरू झालेला कायदेशीर वाद आणि तक्रारदारांनी घेतलेला आक्षेप यामुळे जिल्ह्यातील सत्तासमीकरणे अस्थिर झाली आहेत. या सर्व घडामोडींच्या केंद्रस्थानी सातारा जिल्हा असल्याने मुख्यमंत्र्यांच्या या दौऱ्यात 'डॅमेज कंट्रोल' संदर्भात काही ठोस निर्णय घेतले जाण्याची दाट शक्यता आहे.

# आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून रेल्वे अतिक्रमण धारकांच्या प्रश्नावर उपाययोजना; पुनर्वसनावर विशेष भर

## जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत पुनर्वसनासाठी टप्प्याटप्प्याची योजना व निश्चित कालमर्यादा

### ३ ते ५ वर्षांत ९०० हून अधिक घरे उपलब्ध करण्याचे नियोजन; लाभार्थ्यांना अल्पदरात घरे उपलब्ध करण्यासाठी ठोस प्रयत्न

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून रेल्वे अतिक्रमणाच्या प्रश्नावर सर्वसमावेशक व मानवतावादी तोडगा काढण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत चंद्रपूर रेल्वेलाइनलगतच्या अतिक्रमणधारकांचे पुनर्वसन प्राधान्याने करत टप्प्याटप्प्याने नियोजनबद्ध कारवाई करण्यावर भर देण्यात आला. नागरिकांवर कोणताही अन्याय होणार नाही याची काळजी घेत निश्चित कालमर्यादा ठरवूनच पुढील निर्णय घेण्याची भूमिका मांडण्यात आली.बैठकीस जिल्हाधिकारी वसूमना पंत, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश, रेल्वे विभागाचे दिलीप शेलुकर, रवींद्र सिंग, योगेंद्रसिंग बैस, उपविभागीय अधिकारी विशाल कुमार मेश्राम आदी उपस्थित होते. यावेळी आ. मुनगंटीवार म्हणाले की, रेल्वेच्या तिसऱ्या लाईनचे काम सुरू असून अतिक्रमणधारकांसाठी टप्प्याटप्प्याने पुनर्वसनाची स्पष्ट योजना तयार करणे आवश्यक आहे. येत्या तीन ते पाच वर्षांत ९०० हून अधिक घरे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात यावे.

म्हाडामार्फत २००४ घरे उभारली जात असून येत्या एक ते दीड वर्षांत ती पूर्णत्वास येणार आहेत. या घरांसाठी २३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला असून, सुमारे १० लाख रुपये बांधकाम खर्च असलेल्या घरांवर साडेचार लाख रुपयांची सबसिडी देऊन लाभार्थ्यांना ३ ते ४ लाख रुपयांत घरे उपलब्ध करून देण्याचा आपला आग्रह असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले.

गेल्या ४० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या चंद्रपूर शहरातील सावरकर नगर, जलनगर, उडिया बस्ती, महाकाली कॉलरी, बगड खिडकी नागरिकांच्या पुनर्वसनाशिवाय कोणतीही कारवाई करू नये, अशी



ठाम भूमिका मांडताना प्रथम टप्प्यातील २४ घरांच्या हटवणीसंदर्भातही सर्वसमावेशक निर्णय होईपर्यंत कार्यवाही थांबविण्याची मागणी त्यांनी केली. तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत लवकरच बैठक घेण्यात येणार असल्याचे आ.मुनगंटीवार यांनी सांगितले.यापूर्वी मुंबई येथे मध्य रेल्वेच्या महाप्रबंधकांसोबत झालेल्या बैठकीत विविध प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचा उल्लेख आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केला. विशेषतः चंद्रपूर रेल्वेलाईनलगतच्या अतिक्रमणधारकांवरील कारवाई तात्पुरती स्थगित ठेवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, स्थानिक रेल्वे प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली. अतिक्रमणधारकांना योग्य नुकसानभरपाई मिळावी, तसेच भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये यासाठी संबंधित विभागाचे संपर्क क्रमांक दर्शविणारे सूचना फलक उभारण्याचे निर्देशही आ.मुनगंटीवार यांनी यावेळी दिले.दरम्यान, आ. सुधीर मुनगंटीवार यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देत रेल्वे प्रशासनासोबत समन्वय साधून अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी सर्व बाबींचा विचार करणारा व्यवस्थित व नियोजनबद्ध आराखडा तातडीने तयार करावा, असे स्पष्ट केले. या आराखड्यात नागरिकांचे हित जपले जाईल, त्यांना कोणताही अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जावी, तसेच पुनर्वसन प्रक्रिया पारदर्शक आणि टप्प्याटप्प्याने राबविण्यात यावी, अशा सूचनाही आ.मुनगंटीवार यांनी यावेळी दिल्या.

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या देगलुर तालुका अध्यक्षपदी प्रशांत पाटील दोसपल्ले यांची निवड

दैनिक वादळ वार्ता

**देगलुर । प्रतिनिधी**

देगलूर तालुक्यातील मानूर येथील प्रशांत पाटील दोसपल्ले हे सामाजिक कार्यात सक्रिय असून गेल्या अनेक दहा वर्षांपासून युवा संघटन मजबूत करून शिवसेना पक्षात अनेक आंदोलन जनहितार्थ मोर्चे रक्तदान शिबिर अशी अनेक उपक्रम त्यांनी राबवले देगलूर तालुक्यातील ज्येष्ठ नेते व्यंकटराव पाटील गोजेगावकर साहेबांचे ते कट्टर समर्थक असून त्यांच्या समवेत खांद्याला खांदा लावून गेली दहा वर्षे सतत कार्यरत असल्यामुळे सन्माननीय व्यंकटराव पाटील गोजेगावकर साहेब यांच्या शिफारसी वरून नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय माजी खासदार तथा आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांच्या हस्ते मोहनांना हंबर्डे यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या पत्राद्वारे देगलूर राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या तालुका अध्यक्षपदी प्रशांत पाटील दोसपल्ले यांची निवड करण्यात आली असून या



निवडीबाबत देगलूर तालुक्यात युवा वर्गामध्ये एक नवचैतन्य निर्माण झाले आहे या निवडीबद्दल अनेक ज्येष्ठ पदाधिकारी कार्यकर्ते डॉक्टर वकील इंजिनियर आधी जणांचे फोन द्वारे प्रशांत पाटील दोसपल्ले यांना शुभेच्छा प्राप्त झाल्या असून आज पर्यंत केलेल्या कार्याची पावती भेटले असल्याचे भेटुन प्रशांत पाटील यांनी सांगितलेले आहे या निवडीचे औचित साधून त्यांच्या मित्र परिवाराच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार करण्यात आला यावेळी दीपक संगमकर एडवोकेट आकाश जाधव नितेश शेठ काकांनी बद्री बालाजी मुकुंद भुताळे धनाजी जोशी भाजप शहराध्यक्ष प्रशांत दासरवार,बजरंग दासरवार गोरखनाथ शिंपाळे शिवाजी पाटील सुगावकर सचिन कांबळे, शिवा फुलारी इ. उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी स्वत:च्या क्षमता विकसित करणे आवश्यक आहे-जी.बी.गदळे

## स्वामी विवेकानंद शाळेतील विद्यार्थ्यांचा स्क्रीनिंग टेस्टमध्ये निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय तसेच संत तुकाराम महाविद्यालय स्क्रीनिंग टेस्ट द्वारे निवड झालेल्या एकूण सात विद्यार्थ्यांचा पालकासह सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचेउपाध्यक्ष नईमोद्दीन इनामदार, सचिव जी.बी.गदळे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे हे उपस्थित होते.

याप्रसंगी राजर्षी शाहू महाविद्यालय लातूर स्क्रीनिंग टेस्टमध्ये निवड झालेले विद्यार्थी श्रावण रामदास चाटे,आकांक्षा दीपक सांजुरे,प्रज्ञा दिनकर घुले,श्रेयश रघुनाथ



बनसोडे तर संत तुकाराम महाविद्यालय स्क्रीनिंग टेस्टमध्ये- सई बालाजी साखरे,ज्ञानदा सुनील गायकवाड,आयुष जयप्रकाश सातपुते या विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बोलताना संस्थेचे सचिव जी.बी. गदळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी भविष्यातील अशा विविध परीक्षांना सामोरे जाण्यासाठी व या स्पर्धेमध्ये टिकून राहण्या साठी स्वत:च्या क्षमता विकसित केल्या पाहिजेत.वरील विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सहसचिव तथा मुख्याध्यापक उपेंद्र कोकीळ,कोषाध्यक्ष फजीलोद्दीन काझी, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे,प्राचार्य भैरट सर,प्राथमिक विभागाचे मु.अ.वसंत शितोळे,स्वयंअर्थ शाळेचे मु.अ.संघपाल मस्के, स्वयंअर्थ शा.व्य.स. अध्यक्ष नारायणराव अंधारे तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद यांनी अभिनंदन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.तर आभार कल्याण आदमाने यांनी मानले.

# केज येथे संघटन सृजन अभियान संपन्न




दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या माध्यमातून संपूर्ण देशामध्ये मागच्या काही दिवसांपासून संघटन सृजन अभियान सुरू आहे.गाव पातळी पर्यंत पोहोचलेले हे अभियान बीड जिल्ह्यातही सुरु असून शेवटच्या टप्प्यात आहे. आणि याचाच एक भाग म्हणून केज तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने केज येथे संघटन सृजन अभियान आयोजित करण्यात आले होते.

केज येथे बुधवार दिनांक ९ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या अभियानासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस च्या सरचिटणीस नीतू वर्मा यांची प्रमुख उपस्थिती होती.तर सदरील कार्यक्रमासाठी बीड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राहुल सोनवणे, काँग्रेसचे जेष्ठ नेते प्रकाश भन्साळी,बाळासाहेब ठोंबरे,कविताताई कराड यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.सदरील कार्यक्रमादरम्यान राहुल सोनवणे यांनी प्रस्ताविक केले आणि यामध्ये त्यांनी संघटन सृजन अभियानाची सविस्तर माहिती दिली.तसेच जिल्हाध्यक्ष पदाचा कार्यभार हाती घेतल्या पासून बीड जिल्ह्यामध्ये जे जे विविध उपक्रम राबवल्या गेले त्याचीही माहिती सादर केली. यावेळी प्रकाश भन्साळी, कविताताई कराड, सिद्धेश्वर पाटील यांच्या सह सामाजिक क्षेत्रातील काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना राहुल सोनवणे यांच्या कार्यकाळात बीड जिल्हा काँग्रेसला नवचेतना मिळाली असल्याचे सांगितले.यावेळी कार्यक्रमानंतर नीतू वर्मा यांनी वैयक्तिक भेटीसाठी वेळ देऊन कार्यकर्ते व पत्रकारांशी संवादही साधला.तसेच बीड जिल्हा काँग्रेसचे काम समाधानकारक असून सर्वानुमते जिल्हाध्यक्ष निवडला जाणार असल्याचे स्पष्ट केले.दरम्यान सदरील कार्यक्रमासाठी तालुक्यातील काँग्रेसचे कार्यकर्ते,सामाजिक कार्यकर्ते यांच्यासह मोठ्या प्रमाणावर नागरिकांची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या नांदेड जिल्हा उपाध्यक्ष पदी नारायण पाटील शेळगावकर यांची वर्णी!

### खा.प्रतापराव पाटील चिखलीकर आणि जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान



दैनिक वादळ वार्ता

**देगलुर । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी देगलूर तालुक्यातील शेळगाव (नृसिंह) येथील खंबीर नेतृत्व मा. श्री. नारायण सूर्यकांतराव पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

आज ९ एप्रिल रोजी नांदेड येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हा कार्यालयात आयोजित एका विशेष कार्यक्रमात ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. पक्षाचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर आणि ज्येष्ठ नेते खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या शुभहस्ते नारायण पाटील यांना नियुक्ती पत्र देऊन त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे हे नियुक्ती पत्र ३१ मार्च रोजीच निर्गमित करण्यात आले होते, मात्र आज अधिकृतरित्या सन्मानपूर्वक त्याचे वितरण करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर आमदार सतीश चव्हाण, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आमदार अविनाशराव घाटे साहेब, शिवाजीराव कनकटे, मंगल देशमुख, प्रशांत पाटील मानुरकर, सूर्यवंशी साहेब, नारायण पाटील शेळगावकर, रवींद्र ध्याडे, संजय पाटील मलकापूर, संतोष पाटील नरंगल यांच्यासह पक्षाचे अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. नारायण पाटील यांच्या निवडीमुळे देगलूर तालुका आणि जिल्ह्यात पक्षाला नवी ऊर्जा मिळणार असून, जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी ते सदैव तत्पर राहतील, असा विश्वास जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी यावेळी व्यक्त केला. त्यांच्या या निवडीबद्दल देगलूर तालुक्यातून आणि जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# संपादकीय

## कुंभ हवा; पण करवती आवरा!

धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव असलेल्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा भाग म्हणून नाशिक महानगरपालिका आणि प्रशासकीय यंत्रणा यांनी पुन्हा एकदा वृक्षराजीकडे मोर्चा वळवला आहे. पुरातन, डेरदार वृक्षांची निष्ठूर कत्तल सुरू आहे, ज्यामुळे ' हरित नाशिक ' ही ओळख पुसली जाण्याची भीती आहे. दुर्दैवाने या खेपेला या त्याविरोधात लोकचळवळ उभी राहताना दिसत नाही. निवडक पर्यावरणवादी वगळता सारेच हताशपणे बघत आहेत. हे सारे शहराच्या मुळावर उठणारे आहे. मात्र, सत्ताधारी राजकीय व्यवस्था आणि बाबूशाहीच्या संगनमतापुढे जणू सारेच हतबल झाल्याचे दिसते.

काही महिन्यांपूर्वीच तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. महापालिका निवडणुकीच्या तोंडावर यावरून बरेच 'रामायण' घडल्यानंतर हा विषय 'ठंडा करके खाओ' नीतीनुसार हाताळण्यात आला. आता कोणती निवडणूक नसल्याने कसला अडथळाही नाही. त्यामुळे शहरभरातील रस्ते खोदल्यानंतर आता वृक्षांची कत्तर सुरू आहे. त्यासाठी विकासकामे आणि रस्ते रुंदीकरणाचे कारण दिले जाते. तपोवनातील संभाव्य वृक्षतोडीबाबत हरित लवादाने गंभीर निरीक्षण नोंदवले, नेमके त्याच दिवशी या वृक्षसंपदेवर चाल केली गेली. शेकडो यांत्रिक करवती, यंत्रे, ट्रक व अन्य सामग्रीसह तगडा फौजफाटा मैदानात उतरला आहे. आठ-दहा दिवसांत हजारेक झाडांचे नामोनिशाण मिटविण्याचा चंग यंत्रणेने बांधलेला दिसतो.खुद्द मुख्यमंत्री नाशिकचा कुंभमेळा पर्यावरणपूरक, नशामुक्त व वैश्विक ठरणार असल्याचे सांगतात. संस्कृती आणि परंपरेचा सन्मान राखत एकजुटीने पुढे जाण्याची ग्वाही ते देतात. प्रत्यक्षात मात्र या सोहळ्यासाठी महापालिका आणि कुंभमेळा प्राधिकरण झाडांवर वरवंटा फिरवत आहेत. सिंहस्थासाठी शहराची नवी ओळख बनविताना जुनी ओळख मात्र पुसली जात आहे. केवळ पर्यावरणालाच नव्हे, तर नाशिकच्या लौकिकाला नख लावण्याचे उद्योग सुरू आहेत. काँक्रिटीकरणाच्या विकासाची फळे चाखताना, खरीखुरी फळेफुले भुईसपाट केली जात आहेत.काही लोकांना या वृक्षतोडीच्या विरोधात शड्डू ठोकायचे आहेत; परंतु सनातन परंपरेच्या आणाभाका दिल्या जात असल्याने 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' अशी त्यांची अवस्था झाली आहे. सोशल मीडियाचेसुद्धा अवसान गळाले आहे. काही झाडे रस्त्याच्या मधोमध आहेत. तेथे अपघात घडून अनेक प्रवाशांचा बळी गेला आहे. त्यामुळे 'सुंठेवाचून खोकला गेला' म्हणत काही रहिवासी या तोडीपासून अंतर ठेवून आहेत. बोटांवर मोजण्याइतकेच वृक्षप्रेमी प्रशासनाविरोधात उभे ठाकले आहेत. महाकाय वटवृक्षांच्या पुनर्रोपणाच्या पर्यायाची सक्षमपणे अंमलबजावणी झाल्यास काही प्रश्न नक्कीच सुटतील. परंतु, या किचकट भानगडीत यंत्रणेला पडायचे नसल्याने त्यावर फुली मारण्यात आली आहे. अर्थात, मागील कुंभमेळ्यासाठी हटवून इतरत्र लावली गेलेली अशी किती झाडे जगली, हासुद्धा संशोधनाचा विषय. बरे, काही शे-पन्नास वर्षे वयाच्या झाडांना न्यायालयाने अभय दिले असूनही यंत्रणा जुमानायला तयार नाही. भल्यामोठ्या क्रेनही उचलू न शकणारे महाकाय वृक्ष केवळ पाच-पंचवीस वर्षांचे असल्याचे दावे केले जात आहेत. तसे कागद आधीच रंगवले गेले आहेत. दर बारा वर्षांनी नाशिकचा कायापालट होतो, तेव्हा त्याचा पहिला आणि सर्वांत मोठा फटका हिरव्याकंच वृक्षसंपदेला बसतो. येथील संस्कृती, परंपरा व वारशाचा अविभाज्य भाग असलेली वृक्षराजी संपविणे हा जणू अजेंडा घेऊनच काही लोक काम करतात. सध्या रस्तोरस्ती कापून पडलेल्या झाडांच्या बुंध्याबांध्यांचे ढीग पाहून मन हेलावते. धर्माची भूमिका निसर्गाला पूरक राहिली आहे. विकासकामे नक्कीच हवी आहेत, परंतु, ती शाश्वत व निसर्गाशी नाते जपणारी असावीत. कारण तोच खरा धर्म आहे. आज अनेक डेरेदार वृक्ष अनाम, एकाकीपणे धारातीर्थी पडत आहेत. वृक्षतोडीला विरोध करणाऱ्या मोजक्या पर्यावरणप्रेमींची साद करवतींच्या कर्कश आवाजात हवेत विरून जात आहे. इतिहास मात्र या कृतघ्नपणाची नकोशी नोंद घेईल, हे प्रशासनाने लक्षात ठेवावे.

# नायगाव तालुक्यात खत पुरवठ्यावर 'लिंकिंग' चा अडथळा विक्रेत्यांची तहसीलदारांकडे धाव

दैनिक वादळ वार्ता

**नायगांव । हानुमंत चंदनकर**

खरीप हंगाम २०२६ तोंडावर असताना शेतकऱ्यांना रासायनिक खतांच्या टंचाईचा सामना करावा लागत असून, 'लिंकिंग'च्या अटीमुळे खत पुरवठा विस्कळीत होत असल्याचा गंभीर आरोप नायगाव तालुका कृषी साहित्य विक्रेता संघाने केला आहे. याबाबत संघाच्या वतीने तहसीलदार तथा तालुका दंडाधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने 'विना लिंकिंग' खत पुरवठा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.




निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, सध्या डीएपी व युरिया या खतांना लिंकिंगची सक्ती करण्यात आली आहे. मात्र, या दोन्ही खतांची शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात मागणी असताना पुरवठा अपुरा पडत आहे. त्यामुळे विक्रेत्यांना इच्छित प्रमाणात खत उपलब्ध होत नाही. याउलट लिंकिंगद्वारे दिला जाणारा माल पूर्ण किमतीत घ्यावा लागतो, परंतु त्यातील काही साहित्य बाजारात कमी दराने विकावे लागत असल्याने विक्रेत्यांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे.

याशिवाय, वाहतूक, हमाली, भाडे, रेल्वे हँडलिंग आदी खर्च वाढल्याने खत विक्रीतून नफा न मिळता उलट खर्च वाढत असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. परिणामी, विक्रेते आर्थिक अडचणीत सापडत असून, शेतकऱ्यांमध्येही नाराजी वाढत आहे.नायगाव बाजारपेठेतच नव्हे तर परिसरातील अनेक गावांतील शेतकरी खत खरेदीसाठी येत असल्याने मागणीचा ताण अधिक वाढला आहे. मात्र, संबंधित कंपन्यांकडून तालुक्याच्या गरजेनुसार पुरवठा होत नसल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

**विना लिंकिंग खत पुरवठ्याची मागणी**

शेतकरी व विक्रेते दोघेही अडचणीत सापडले असताना डीएपी, युरिया व इतर रासायनिक खते 'विना लिंकिंग' उपलब्ध करून दिल्यास सर्व समस्या सुटू शकतात, असा दावा संघाने केला आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून शेतकऱ्यांना सुरळीत खत पुरवठा सुनिश्चित करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

**निवेदनावर स्वाक्षरी करणारे पदाधिकारी**

साईनाथ द. अंडेवार (सचिव), प्रशांत मारोतराव पाटील (उपाध्यक्ष), दिलीप एककाळे (उपाध्यक्ष) व प्रकाश माणिकराव पाटील (अध्यक्ष).,दशरथ बचेवार ,तिरुपती वडजे, साईनाथ मेडेवार,अजिंक्य कल्याण,सुधाकर जवाद्वार, महाराज आदी कृषी दुकानदार हजर होते.

# भाजपा प्रदेश माध्यम प्रमुखपदी गोविंद येतयेकर यांची तर सह माध्यम प्रमुखपदी ओम प्रकाश चौहान

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश च्या माध्यम प्रमुख पदी श्रीगोविंद येतयेकर यांची तर सह माध्यम प्रमुख पदी ओम प्रकाश चौहान यांची नियुक्ती करण्यात आली आहे

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत श्री गोविंद येतयेकर व श्री ओम प्रकाश चौहान यांना संघटनात्मक नियुक्तीचे पत्र देण्यात आले. यावेळी रविंद्र चव्हाण यांनी त्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी भाजपचे सरचिटणीस राजेश पांडे, सरचिटणीस सुनील राणे



भारतीय जनता युवा मोर्चाचे अध्यक्ष कृष्णराज महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.

गोविंद येतयेकर हे एक पत्रकार आणि महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आहेत. यापूर्वी प्रबोधन गोरेगावच्या कार्यकारिणीत देखील सक्रिय होते. पत्रकार आणि सामाजिक क्षेत्रात कार्य

आहे. ओमप्रकाश चौहान हे भाजपाचे जुने कार्यकर्ते असून माध्यम विभागात अनेक वर्षापासून कार्यरत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपची माध्यम व्यवस्था अधिक मजबूत करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यांच्या निवडीचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# मिरा-भाईंदरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा उभारणीला गती

## सामाजिक न्याय विभागाकडून १.४६ कोटींची तरतूद-परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे घोडबंदर, सर्वे क्र. २३३ येथील जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १६ फुटी पूर्णाकृती पुतळ्याच्या उभारणीस गती मिळाली असून, यासाठी सामाजिक न्याय विभागामार्फत मिरा-भाईंदर महापालिकेला १ कोटी ४६ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पुढील सहा महिन्यांत पुतळा उभारणीची प्रक्रिया पूर्ण होईल, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.मंत्रालयात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांच्या दालनात आयोजित बैठकीनंतर ते बोलत होते. या बैठकीस सामाजिक न्याय विभागाचे सचिव हर्षदीप कांबळे तसेच मिरा-भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त राधा बिनोद शर्मा शहर अभियंता दीपक खांबित यांच्यासह



वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, संबंधित सर्वे क्रमांकातील सुमारे ३८०० चौ.मी. जागा यापूर्वी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत सामाजिक न्याय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या ठिकाणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकासह बहुउद्देशीय इमारत उभारण्यासाठी सुरुवातीला सुमारे १४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात या स्मारकासाठी २० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधीही मंजूर करण्यात आला.

या निधीतून लंडनमधील स्मारकाच्या धर्तीवर ठाणे जिल्ह्यातील पहिले भव्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक मिरा-भाईंदर शहरात साकारले जात आहे.

दरम्यान, आंबेडकर प्रेमी जनतेच्या मागणीचा विचार करून स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून या ठिकाणी १६ फुटी पूर्णाकृती पुतळा उभारण्याचा पुढाकार घेतल्याचेही सरनाईक यांनी स्पष्ट केले.

पुतळा उभारणीसाठी सुमारे २०० चौ.मी. जागेची आवश्यकता असून ती सामाजिक न्याय विभागामार्फत महापालिकेला हस्तांतरित करण्यात येत आहे. तसेच शासनाच्या २ मे २०१७ च्या मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक परवानग्या, ना हरकत प्रमाणपत्रे आणि इतर कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. या सर्व प्रक्रियेमुळे मिरा-भाईंदर परिसरात लवकरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भव्य स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारणीस गती मिळणार असल्याचा विश्वास मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

# मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे अंधापुरी घाट येथे गुरु बंकट स्वामी महाराज यांच्या कृपेने व वै ह.भ.प गिरी महाराज व ज्ञानेश्वर माऊली,सुदाम देव महाराज, गुरुवर्य शांती ब्रह्म रामहरी बाबा यांच्या कृपाशीर्वादाने व ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे व महादेव महाराज (तात्या) यांच्या मार्गदर्शनाखाली व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने वार शुक्रवार दि.१०/४/ २०२६ रोजी मौजे अंधापुरी घाट येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.सात दिवस चालणाऱ्या या सप्ताह निमित्त गावामध्ये रोज वेगवेगळ्या नामांकित कीर्तनकारांचे अमृततुल्य असे किर्तन सेवा होणार आहेत तसेच भजन,प्रवचन,हरिपाठ व हरीजागर असे कार्यक्रम होणार आहेत.अखंड हरिनाम सप्ताह निमित्त गावामध्ये रोज गावकऱ्यांच्या वतीने व समस्त गावकरी मंडळी अंधापुरी घाट यांच्यावतीने सप्ताह निमित्त महापंगतीचे आयोजन करण्यात आले असून रोज सकाळ व संध्याकाळ गावामध्ये वेगवेगळ्या महापंगती होणार असून परिसरातील भावीक भक्तांनी,नागरिकांनी व गावकऱ्यांनी जास्तीत जास्त संख्येने याचा लाभ घ्यावा असे आवाहन गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले आहे.अखंड हरिनाम सप्ताह निमित्त वार शुक्रवार,दि.१७/४/२०२६ रोजी श्री गुरुवर्य ह भ प लक्ष्मण महाराज मेंगडे (मठाधिपती बंकट स्वामी संस्थान निनगुर,आळंदी,पंढरपूर) यांचे सकाळी ११ ते १ या वेळेत अमृततुल्य असे काल्याचे किर्तन होणार असून नंतर लगेचच महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे तरी परिसरातील जास्तीत जास्त भाविक भक्तांनी व नागरिकांनी तसेच गावकऱ्यांनी काल्याच्या कीर्तनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे गावकऱ्यांच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते 'देव घरा आयला'चे उद्घाटन!

## नाटकांची परंपरा जपणारे रांजणपाडा गाव-महेंद्रशेठ घरत

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

पूर्वीच्या काळी जत्रा म्हणजे गावोगावी आनंदोत्सव असायचा. त्याकाळी बहुतांश घरांमध्ये फक्त जत्रेलाच मटन शिजायचे. त्यामुळे गावात मटनाचा सुगंध दरवळत असे. आलेल्या प्रत्येक पाहुण्याला हक्काने जेवायला दोन घास तरी खा, असा आग्रह केला जात असे. तसेच जत्रे निमित्ताने नाटक, कव्वालीचे सामने वा इतर मनोरंजनात्मक कार्यक्रम असायचे. ही परंपरा आजही काही गावांमध्ये जपली जातेय, त्यापैकीच उरण तालुक्यातील रांजणपाडा गाव. मंगळवारी रांजणपाडा गावची यात्रा होती. त्यानिमित्ताने जुन्याजाणत्या हौशी कलाकारांनी स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी 'देव घरा आयला' या नाटकाचा प्रयोग आयोजित केला होता. त्याचे उद्घाटन आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांच्या हस्ते करण्यात आले.

त्यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, हसुराम पाटील यांच्यासारखे अनेक हरहुन्नरी कलाकार ग्रामीण भागात आहेत. त्यांच्या नसानसांत नाटक भिनले आहे. त्यामुळे पूर्वीच्या काळी गावोगावी होणाऱ्या नाटकांची परंपरा ते आजही जपत आहेत. ते नवीन पिढीला सोबत घेऊन त्यांच्यात कलेचे बीज रोवत आहेत. वास्तवदर्शी नाटक सादर करण्यात त्यांचा हात कुणी धरू शकत नाही. लहान मुले, तरुण यांच्यातील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी नाटक बसवणे आणि त्याचे उत्तम सादरीकरण करणे, हे कौतुकास्पद आहे. त्यामुळे रांजणपाडा ग्रामस्थांचे आणि उत्तम नाटक सादर करणारे कलाकार यांचे मनापासून अभिनंदन! मी कलेचा भुकेलेला आणि प्रोत्साहन देणारा आहे. मी नाटक वेडा आहे. पूर्वी मी शिवाजी मंदिरला नाटक पाहायला जायचो, आजही मला उसंत मिळाली नाटकाचा मोह आवरत नाही. कारण नाटक ही एक जिवंत कला आहे.

रांजणपाडा येथील 'अष्टगंध सांस्कृतिक, कला, सामाजिक मंडळा'च्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मंगळवारी ( ता. ७) धनेश्वर म्हात्रे लिखित व हसुराम पाटील दिग्दर्शित तसेच प्रसाद कडू सहदिग्दर्शक असलेल्या नाटकाचा प्रयोग रांजणपाडा (उरण) येथील हनुमान मंदिराच्या पटांगणात सादर करण्यात आला. यावेळी महेंद्रशेठ घरत बोलत होते. या नाटकाची निर्मिती रमेश चिंतामण कोळी यांची आहे. नाट्य मंडळाचे अध्यक्ष- अशोक कान्हा म्हात्रे, सचिव- दत्तात्रेय घरत, खजिनदार- प्रज्योत पाटील, सल्लागार- रंजन ठाकूर, नरेंद्र ठाकूर, पत्रकार दत्तात्रेय म्हात्रे यांच्या टीमने उत्तम कामगिरी केली आहे.

दिगंबर कोळी, मनोहर ठाकूर यांची संकल्पना आणि धनेश्वर म्हात्रे, हसुराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, दिगंबर कोळी, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, वैभव म्हात्रे, प्रसाद कडू, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, व रुद्र ठाकूर आदी कलाकारांनी आपल्या अभिनयाने रसिकांना जिंकले. आनंद कुबल यांचे संगीत, राजा जोशी यांचे नेपथ्य, डी. वाय. म्हात्रे यांची रंगभूषा, संतोष साऊंड सर्विस यांची रंगमंच व्यवस्था प्रश्वंसनीय होती. आगरी संस्कृती, आगरी भाषेतील गोडवा, आगरी रुढी-परंपरा व नातेसंबंधांवर आधारित वास्तवदर्शी 'देव घरा आयला' हे नाटक रसिकांच्या मनात कायम घर करेल, अशा भावना यावेळी रसिकांनी व्यक्त केल्या.

# रेल्वे अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनाला गती
# ३-५ वर्षांत ९०० घरे उभारण्याचा आराखडा

दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

माजी वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूर शहरातील रेल्वे अतिक्रमणधारकांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातील २० कलमी सभागृहात झालेल्या बैठकीत पुनर्वसनाला प्राधान्य देत टप्प्याटप्प्याने नियोजनबद्ध कारवाई करण्यावर भर देण्यात आला.

या बैठकीस जिल्हाधिकारी वसूमना पंत, मनपा आयुक्त अकुनूरी नरेश तसेच रेल्वे विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अतिक्रमणधारकांवर अन्याय होणार नाही, याची दक्षता घेत निश्चित कालमर्यादा ठरवूनच पुढील कार्यवाही करण्याचे ठरले.




आ. मुनगंटीवार यांनी सांगितले की, रेल्वेच्या तिसऱ्या लाईनचे काम सुरू असल्याने अतिक्रमणधारकांच्या पुनर्वसनासाठी ठोस व स्पष्ट आराखडा आवश्यक आहे. त्यानुसार येत्या तीन ते पाच वर्षांत ९०० हून अधिक घरे उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात येणार आहे. म्हाडा मार्फत २००४ घरे उभारली जात असून पुढील एक ते दीड वर्षांत ती पूर्णत्वास येणार आहेत. या प्रकल्पासाठी २३४ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. सुमारे १० लाख रुपये खर्च असलेल्या घरांवर साडेचार लाख रुपयांची अनुदान देऊन लाभार्थ्यांना ही घरे ३ ते ४ लाख रुपयांत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

चंद्रपूर शहरातील सावरकर नगर, जलनगर, उडिया बस्ती, महाकाली कॉलरी, बगड खिडकी येथील गेल्या ४० वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या नागरिकांचे पुनर्वसन झाल्याशिवाय कोणतीही कारवाई करू नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. तसेच पहिल्या टप्प्यातील २४ घरांच्या हटवणीची कारवाई सर्वसमावेशक निर्णय होईपर्यंत थांबवावी, अशी मागणीही त्यांनी केली.

यावेळी अश्विनी वैष्णव यांच्यासोबत लवकरच बैठक होणार असल्याची माहिती देण्यात आली. यापूर्वी मुंबई येथे मध्य रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचा उल्लेखही करण्यात आला.

दरम्यान, स्थानिक रेल्वे प्रशासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्याची बाब निदर्शनास आणून देत अतिक्रमणधारकांना योग्य नुकसानभरपाई देण्याची गरजही व्यक्त करण्यात आली. तसेच भविष्यात अतिक्रमण टाळण्यासाठी सूचना फलक उभारण्याचे निर्देश देण्यात आले.

बैठकीच्या शेवटी जिल्हाधिकाऱ्यांना रेल्वे प्रशासनाशी समन्वय साधून पारदर्शक, टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणारा आणि नागरिकहित जपणारा पुनर्वसन आराखडा तातडीने तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

# पाणी टंचाई प्रश्नावर प्रशासनाची हालचाल
## इद्रिस मुलतानी यांच्या पाठपुराव्याला यश

दैनिक वादळ वार्ता
**फर्दापूर । प्रतिनिधी**

स्थानिक पातळीवर तीव्र होत चाललेल्या पाणी टंचाईच्या प्रश्नावर अखेर प्रशासनाने ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. सामाजिक कार्यकर्ते इद्रिस मुलतानी यांनी या समस्येबाबत केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर संबंधित विभागाने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा केला.

माहितीनुसार, काल मंत्रालयात राज्यमंत्री म.न. मेघनाताई बोर्डीकर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली होती. या बैठकीनंतर तात्काळ कार्यवाही करत आज शासकीय अधिकाऱ्यांनी संबंधित भागाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.



या पाहणीदरम्यान अधिक्षक अभियंता एम.जी.पी. दीपक कोळी, उपअभियंता चारवे साहेब, जिल्हा परिषदचे वाघ साहेब, सहायक अभियंता शेजुळ साहेब, शाखा अभियंता गिरी साहेब तसेच मंगरूले यांच्यासह इतर शासकीय कर्मचारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती, उपलब्ध स्रोत आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या अडचणींची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामा नोंदवला.

यावेळी स्थानिक पातळीवरील प्रतिनिधी आणि नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरपंच आजू, माजी ग्रामपंचायत सदस्य शेख निसार, योगेश शिंदे, फिरोज तडवी, समाधान बावस्कर, भगवान जाधव, विलास आगळे, माजेद तडवी, समीर तडवी आदींनी प्रशासनासमोर आपली मते आणि समस्या मांडल्या.

स्थानिक नागरिकांनी पाणीटंचाईमुळे होत असलेल्या दैनंदिन अडचणींचा उल्लेख करत तातडीने कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. यावर अधिकाऱ्यांनी परिस्थितीचा अहवाल वरिष्ठांकडे सादर करून योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

दरम्यान, इद्रिस मुलतानी यांच्या पुढाकारामुळे हा प्रश्न प्रशासनाच्या स्तरावर पोहोचल्याने स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त केले जात असून, पुढील काही दिवसांत ठोस उपाययोजना जाहीर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# ठाकर आडगांव येथील कविला 'महाराष्ट्राचे दादा' वर्णन एक प्रेरणादायी पुस्तकात मान

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री, पुरोगामी विचारांचे खंदे नेते स्वर्गीय ना.अजितदादा अनंतराव पवार यांच्या चरित्र आधारित आठवणींवर संपादक संतोष धायबर आणि प्रकाशक शीतल संतोष धायबर यांनी आपल्या ईश्वरी प्रकाशन पुणे या संस्थेच्या माध्यमातून प्रकाशित केले आहे. महाराष्ट्राचे दादा एक प्रेरणादायी चरित्र हे पुस्तक महाराष्ट्रातील नामवंत लेखक अर्जुन विष्णू जाधव, डॉ. सुवर्णा निंबाळकर, धनश्री पवार,शिवाजी पाटील, दत्ता धायगुडे, डॉ. प्रकाश पाढरपिसे, डॉ. अशोक बालगुडे, सोनाली कापुरे, श्रृती पवार, भाग्यश्री आपेगावकर, सुनिता नेराळे, अनिल चव्हाण, प्रशांत हिंगे, सुजित दिवेकर, प्रशांत अडसूळ, वेदांत ढगे-पाटील, राजेश धावारे, सुनिल पांडे, सुहास गायकवाड, प्रकाश केंद्रे, युवराज गोपाळे, चंद्रशेखर हळेमनी, रितेश कांबळे, अनमोल गेडाम, सम्राट समाधान हनुमान आदी पंचवीस लेखकाने अजितदादा यांच्या जित्या जागत्या आठवणी जाग्या केलेल्या असून हे पुस्तक खूपच वाचनिय असून संग्रही ठेवण्याजोगे आहे.



महाराष्ट्रातील जनतेवर, कलावंत, कलाकार, साहित्यिक, खेळाडू यांच्यावर अजितदादा पवार यांचे खूप प्रेम होते. ते कधीच आपल्या पाया पडायला देत नव्हते. नमस्कार करा असं सांगत असतं. त्यांच्या दुमिर्क आणि आदर्शवादी आठवणी या पुस्तकातील लेखकाने आप आपल्या परीने सुरेख जागवल्या आहेत. हे पुस्तक वाचताना दादांच्या आठवणी, डोळ्यात आणती पाणी नक्कीच डोळ्यातून पाणी येऊ लागते अशा मनमोहक लेखणीतुन दांदाबद्दल लेखकाने सगळ्या गोष्टी व दादांबद्दल प्रेम आपुलकी स्नेह जिव्हाळा वृद्धिंगत केला आहे.

# मांगीरबाबा यात्रेसाठी लाखोंच्या संख्येत भाविकांची गर्दी;भाविक शेंद्रा गावात दाखल

दैनिक वादळ वार्ता
**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर - महाराष्ट्रातील शेंद्रा येथील प्रसिद्ध मांगिरबाबा यात्रेच्या पहिल्या दिवशी सोमवारी भाविकांची संख्या सुरुवातीस कमी होती.मात्र रात्रीतून भाविकांच्या गर्दीत वाढ होताना दिसून आली. रविवारी मध्यरात्री मांगीरबाबा यांची महाआरती देवस्थानचे अध्यक्ष श्री.भास्कर कचकुरे,गावचे सरपंच सौ.पुष्पा नामदेव कचकुरे आणि चिकलठाणा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.दरवडे साहेब यांच्या हस्ते करण्यात आली,यावेळी देवस्थान समितीचे उपाध्यक्ष श्री.वैजनाथ मुळे सचिव श्री.सुरेश नाईकवाडे देवस्थान समितीचे सदस्य उपसरपंच श्री.सर्जेराव पाटील कचकुरे, श्री.शंकरभाऊ नाईकवाडे व श्री.बाळूभाऊ कचकुरे व सर्व आजी-माजी ग्रामपंचायत सदस्य आणि शेंद्रा गावचे पोलीस पाटील सर्व ज्येष्ठ ग्रामस्थ शेंद्रा व भाविकांची उपस्थिती होती.महाराष्ट्रासह कर्नाटक,आंध्र प्रदेश,उत्तर प्रदेश गुजरात सह इतर राज्यातील सुद्धा भाविक या यात्रेस येतात.नियमित रेल्वे थांबा नसतानाही भाविकांच्या सोयीसाठी रेल्वे येथे तीन दिवस थांबा दिला जातो.हे या यात्रेचे वैशिष्ट्य मानले जाते.१५दिवस अगोदर पासून देवस्थान समितीच्या व ग्रामपंचायतच्या वतीने भाविकांच्या आवश्यक सर्व सुविधांचे सोयीचे नियोजन केले व सर्वांनी परिश्रम घेतले.




६ एप्रिल पासून मांगिर बाबांच्या यात्रेस प्रारंभ झाला,ही यात्रा १० तारखेपर्यंत चालणार आहे. अशी देवस्थानचे अध्यक्ष भास्कर कचकुरे व सरपंच सौ.पुष्पा नामदेव कचकुरे यांनी सांगितले.

# आरोग्य हीच खरी संपत्ती डॉ.बप्पासाहेब चावरे

दैनिक वादळ वार्ता
**पाचोड । प्रतिनिधी**

आरोग्य हीच खरी संपत्ती ही म्हण केवळ ऐकण्यापुरती नसून मानवी जीवनाचा गाभा आहे. निरोगी शरीर, शांत मन व समाज सुदृढ असेल तरच व्यक्ती, कुटुंब आणि राष्ट्र यांची प्रगती साध्य होते असे प्रतिपादन दिपक हास्पिटलचे डॉ. बप्पासाहेब चावरे यांनी केले. शिवछत्रपती महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिनानिमित्त (दि. ७) प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी वे टू हेल्थ लॅबोरेटरीचे संचालक विश्वंभर लोहगळे यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देवून यथोचित सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी यावेळी मार्गदर्शन करताना सांगितले की दरवर्षी ७ एप्रिल हा दिवस जागतिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ औपचारिक नसून तो संपूर्ण मानवजातीला आरोग्याविषयी सजग करणारा, जीवनशैलीचा पुनर्विचार करण्यास भाग पाडणारा आणि निरोगी व सशक्त समाज घडविण्याचा संकल्प करण्याचा विशेष दिवस आहे.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गांधी बानायत यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ. हेमंतकुमार जैन यांनी केले आणि उपस्थितांचे आभार डॉ. उत्तम जाधव यांनी मानले. यावेळी उपप्राचार्य डॉ. शिवाजी यादव, डॉ. विलास महाजन, प्रा. संदिप सातोनकर, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय पुरस्काराने श्रीमती कवडे यांचा सन्मान



दैनिक वादळ वार्ता
**भूम । प्रतिनिधी**

तालुक्यातील मौजे हाडोंग्री येथील भगवंत विद्यालय च्या विज्ञान शिक्षिका श्रीमती कवडे पद्मिनी यांना ३ एप्रिल रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त थोर भौतिकशास्त्रज्ञ, संशोधक,डॉ.सी.व्ही.रमण जिल्हास्तरीय विज्ञान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. परंडा येथे नूतन जि.प.अध्यक्ष अर्चनाताई पाटील यांच्या हस्ते जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य दयानंद जटनोरे यांच्या अध्यक्षतेखालील हा सोहळा पार पडला सन २००८ पासून श्रीमती कवडे हे भगवंत विद्यालयात विज्ञान शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. शाळा, केंद्र, तालुका ,जिल्हा ,विभाग स्तरावर विज्ञान प्रदर्शनात विद्यार्थ्यांना प्रविष्ट करून त्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. या पुरस्काराबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब पाटील हाडोंग्रीकर सचिव शांतलिंग घोंगडे कोषाध्यक्ष मुक्ताप्पा तळेकर व इतर सदस्य यांनी कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे मुख्याध्यापक डोके एस. बी .व शिक्षक वृंद यांनी अभिनंदन केले.

# बाळू कृष्णा पार्टे यांचे दुःखद निधन

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पोलीस कर्मचारी तथा सामाजिक कार्यकर्ते बाळू कृष्णा पार्टे यांचे शनिवार दिनांक ४/४/२०२६ रोजी वयाच्या ७५ वर्षी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे. त्यांचा उत्तरक्रिया विधी बुधवार १५/४/२०२६ रोजी सकाळी त्यांच्या राहत्या घरी बोरी, पानसरे आळी, उरण येथे होणार आहे.



मनमिळाऊ व सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारे बाळू पार्टे हे गोर गरिबांच्या अडी अडचणीत गोरगरिबांना ते मदत करत असल्याने त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केला जात आहे.एक कर्तव्य दक्ष व प्रामाणिक पोलीस कर्मचारी म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होती. सेवानिवृत्त झाल्या नंतरही त्यांनी आपल्या आयुष्यात अनेकांना मार्गदर्शन, मदत केली आहे. त्यांच्या पश्चात पाच मुले, दोन मुली ,बारा नातू असा त्यांचा कुटुंब परिवार आहे.२ मुले महाराष्ट्र पोलीस विभागात कार्यरत आहेत , एक आर्मी मध्ये तर एक नात पीएसआय आहे.देश सेवेला वाहून घेतलेले हे कुटुंब आहे.बाळू पार्टे यांच्या निधनाने पार्टे कुटूंबीयांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. त्यांच्या मृत्यू झाल्याने सर्वत्र मोठया प्रमाणात शोक व्यक्त केला जात आहे.या दुःखद प्रसंगी व विधी प्रसंगी कुठल्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नसल्याचे त्यांच्या कुटुंबियांनी कळविले आहे.

# नागपुरातून 'शेट्टी गँग'चा अट्टल चोर जेरबंद; १६.८० लाखांचा मुद्देमाल जप्त



दैनिक वादळ वार्ता
**चंद्रपूर । प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे शाखा (LCB) व सावली पोलीस स्टेशनच्या संयुक्त पथकाने मोठी कारवाई करत 'शेट्टी गँग'मधील अट्टल घरफोड्या आरोपी रमेश वेलादन शेट्टी (रा. चंद्रपूर, सध्या मुक्काम दिघोरी, नागपूर) याला नागपुरातून अटक केली. मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी समांतर तपास करत ही कारवाई केली.आरोपीकडून मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथील तीन सोनारांकडून चोरीस गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले. सावली पोलीस स्टेशन अपक्र. १०७/२०२५ व मुल पोलीस स्टेशन अपक्र. २५२/२०२५ अंतर्गत कलम ३०५(अ), ३३१(४) भारतीय न्याय संहितेप्रमाणे नोंद असलेल्या गुन्ह्यांतील एकूण ११२ ग्रॅम वजनाचे सुमारे १६ लाख ८० हजार रुपये किमतीचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले.

ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, तसेच मुलचे उपविभागीय पोलीस अधिकारी सत्यजित आमले यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली सावली पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदारांनी संयुक्तरीत्या ही धडक कारवाई यशस्वी केली.

या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, आरोपीकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

# रोहियोचे अपूर्ण कामे समन्वय आणि गतिशीलतेने पूर्ण करा-मंत्री भरत गोगावले



दैनिक वादळ वार्ता

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

रोजगार हमीच्या माध्यमातून गोर- गरीब लाभार्थी आणि शेतकरी बांधवांच्या हिताला प्राधान्य देऊन सर्व कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश रोजगार हमी व फलोत्पादन , खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहामध्ये रोजगार हमी विभागाच्या विविध विकास कामाच्या विभागीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस आमदार रमेश बोरणारे, आमदार श्री विलास भुमरे, रोजगार हमी विभागाचे प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी लातूर भरत बास्टेवाड ,उपसचिव अरविंद पगार, सहसचिव अतुल कोरे, नांदेड जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीन्नू, पी.एम,उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. विभागातील आठही जिल्ह्यातील रोहयो विभागाचे सर्व उप उपजिल्हाधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारीउपस्थित होते.

मंत्री भरत गोगावले म्हणाले की, सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मार्फत काम करून घ्यावे, यासाठी समन्वय ठेवावा वेळोवेळी क्षेत्रभेटी देऊन अपूर्ण कामाचा आढावा घेण्यात यावा. सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व उपजिल्हाधिकारी या सर्वांच्या समन्वयातून गोरगरीब सर्वसामान्य मजूर आणि शेतकऱ्यांना त्यांच्या विकास कामासाठी मदत व्हावी या हेतूने काम करणे आवश्यक आहे. रोजगार हमी विभागाच्या अंतर्गत विविध योजनासाठी उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला वेळेत रुजू करून घेऊन त्यांच्या कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. यातून काम पूर्ण करण्यासाठी गती मिळेल.भूसंपादनासाठी आवश्यक असणाऱ्या निधीचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत यातून अतिरिक्त वेळ गेल्यास त्याचा व्याजाचा निधी देण्यासाठी अडचणी येतात .ते टाळण्यासाठी वेळेत भूसंपादनाच्या मोबदल्याचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात प्राधान्य देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले.

तीन महिन्याच्या आत मनेरगाची काम पूर्ण करावेत. केंद्राने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील मनेरगाची कुशल आणि अकुशल चे काम पूर्ण करून उद्दिष्ट साध्य करण्याचे आवाहन गोगावले यांनी संबंधित यंत्रणाला केले. पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांनी वेळोवेळी पंचायत समिती स्तरावर कामकाजाचा आढावा घेण्याचे आवाहन संबंधित यंत्रणेला करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशी सूचना बैठकीत केली .तसेच वैजापूरचे आमदार रमेश बोरणारे यांनी अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी उर्वरित निधी शासनामार्फत त्वरित उपलब्ध करून देण्यात यावा. यामधून विहिरी ,शेततळे, मातोश्री पानंद रस्ते, घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून , मजूर मस्टर सुरू करण्याची मागणी बैठकीत केली.

छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा रोहयो विभागाचे प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी लातूर,भरत बास्टेवाड यांनी सादर केला. यामध्ये घरकुल, पानंद रस्ते ,युक्तधारा प्रणाली, फेस ऑथेंटिकेशन ,मजुरांचे मस्टर, शेततळे, कुशल आणि कुशल कामाच्या बाबतीत प्रलंबित असलेल्या बाबींचाही जिल्हानिहाय आढावा सादर करण्यात आला. यामध्ये ई -केवायसी करण्याचे प्रमाण कमी असून हे सर्व जिल्ह्यांनी लाभार्थ्यांचे ई-केवायसी करून घेण्याचे काम प्राधान्य करण्याचे आवाहन केले.कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश रोजगार हमी व फलोत्पादन , खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी आज येथे दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन समिती सभागृहामध्ये रोजगार हमी विभागाच्या विविध विकास कामाच्या विभागीय आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस आमदार रमेश बोरणारे, आमदार श्री विलास भुमरे, रोजगार हमी विभागाचे प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी लातूर भरत बास्टेवाड ,उपसचिव अरविंद पगार, सहसचिव अतुल कोरे, नांदेड जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीन्नू, पी.एम,उपायुक्त डॉ. अनंत गव्हाणे यांच्यासह छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी , जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठकीस उपस्थित होते. विभागातील आठही जिल्ह्यातील रोहयो विभागाचे सर्व उप उपजिल्हाधिकारी व उपमुख्य कार्यकारी अधिकारीउपस्थित होते.

मंत्री भरत गोगावले म्हणाले की, सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्या मार्फत काम करून घ्यावे, यासाठी समन्वय ठेवावा वेळोवेळी क्षेत्रभेटी देऊन अपूर्ण कामाचा आढावा घेण्यात यावा. सर्व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी व उपजिल्हाधिकारी या सर्वांच्या समन्वयातून गोरगरीब सर्वसामान्य मजूर आणि शेतकऱ्यांना त्यांच्या विकास कामासाठी मदत व्हावी या हेतूने काम करणे आवश्यक आहे. रोजगार हमी विभागाच्या अंतर्गत विविध योजनासाठी उपलब्ध करून दिलेल्या मनुष्यबळाला वेळेत रुजू करून घेऊन त्यांच्या कामाचे वाटप करणे आवश्यक आहे. यातून काम पूर्ण करण्यासाठी गती मिळेल.भूसंपादनासाठी आवश्यक असणाऱ्या निधीचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत यातून अतिरिक्त वेळ गेल्यास त्याचा व्याजाचा निधी देण्यासाठी अडचणी येतात .ते टाळण्यासाठी वेळेत भूसंपादनाच्या मोबदल्याचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्यात प्राधान्य देण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला देण्यात आले.

तीन महिन्याच्या आत मनेरगाची काम पूर्ण करावेत. केंद्राने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील मनेरगाची कुशल आणि अकुशल चे काम पूर्ण करून उद्दिष्ट साध्य करण्याचे आवाहन गोगावले यांनी संबंधित यंत्रणाला केले.

पैठण विधानसभा मतदारसंघाचे आमदार विलास भुमरे यांनी वेळोवेळी पंचायत समिती स्तरावर कामकाजाचा आढावा घेण्याचे आवाहन संबंधित यंत्रणेला करण्याचे निर्देश देण्यात यावेत अशी सूचना बैठकीत केली .तसेच वैजापूरचे आमदार रमेश बोरणारे यांनी अपूर्ण काम पूर्ण करण्यासाठी उर्वरित निधी शासनामार्फत त्वरित उपलब्ध करून देण्यात यावा. यामधून विहिरी ,शेततळे, मातोश्री पानंद रस्ते, घरकुलांसाठी जागा उपलब्ध करून , मजूर मस्टर सुरू करण्याची मागणी बैठकीत केली.

छत्रपती संभाजीनगर विभागाचा आढावा रोहयो विभागाचे प्रभारी आयुक्त तथा जिल्हाधिकारी लातूर,भरत बास्टेवाड यांनी सादर केला. यामध्ये घरकुल, पानंद रस्ते ,युक्तधारा प्रणाली, फेस ऑथेंटिकेशन ,मजुरांचे मस्टर, शेततळे, कुशल आणि कुशल कामाच्या बाबतीत प्रलंबित असलेल्या बाबींचाही जिल्हानिहाय आढावा सादर करण्यात आला. यामध्ये ई -केवायसी करण्याचे प्रमाण कमी असून हे सर्व जिल्ह्यांनी लाभार्थ्यांचे ई-केवायसी करून घेण्याचे काम प्राधान्य करण्याचे आवाहन केले.

# जिल्हा परिषद शाळेतून नवोदयात झेप प्रचेता काकडेची प्रेरणादायी यशोगाथा

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेत असतानाही जिद्द, मेहनत आणि योग्य मार्गदर्शनाच्या जोरावर मोठे यश संपादन करता येते, हे प्रचेता शिवाजी काकडे हिने सिद्ध करून दाखवले आहे.प्रचेता काकडे हिने इयत्ता तिसरी व चौथीचे शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निलज येथे पूर्ण केले. त्यानंतर पाचवीसाठी तिने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, पिंपळवाडी येथे प्रवेश घेतला. तेथील वर्गशिक्षक मिलिंद कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तिच्या अभ्यासाला योग्य दिशा मिळाली.मात्र, तिच्या शैक्षणिक



वाटचालीचा भक्कम पाया निलज येथील जिल्हा परिषद शाळेतच रचला गेला, असे तिचे वडील शिवाजी काकडे यांनी सांगितले. पाचवीत शिक्षण घेत असतानाच प्रचेता हिने नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा दिली आणि ती यशस्वीरित्या उत्तीर्ण झाली.तिची निवड जवाहर नवोदय विद्यालय येथे झाली असून, येथे इयत्ता सहावी ते बारावीपर्यंतचे शिक्षण केंद्र सरकारमार्फत पूर्णतः मोफत दिले जाते. या विद्यालयात सीबीएसई अभ्यासक्रमानुसार शिक्षण दिले जाते.आपली मुलगी निलजसारख्या छोट्या गावातील जिल्हा परिषद शाळेत शिकली, याचा अभिमान असल्याची भावना शिवाजी काकडे यांनी व्यक्त केली. प्रचेताच्या या यशामुळे परिसरातील इतर विद्यार्थ्यांना नक्कीच प्रेरणा मिळणार आहे.शिवाजी काकडे हे जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, निलज येथे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत असून, त्यांच्या मार्गदर्शनाचाही प्रचेताच्या यशात महत्त्वाचा वाटा आहे.

# पालघर जिल्ह्यातून 'मिंटोनेट+ व्हॉलीबॉल लीग ज्युनिअर २०२६' चषक अनावरणाला सुरुवात

दैनिक वादळ वार्ता

**पालघर । प्रतिनिधी**

मिंटोनेट+ व्हॉलीबॉल अकॅडमी आणि महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या 'मिंटोनेट+ व्हॉलीबॉल लीग-ज्युनिअर २०२६' स्पर्धेच्या चषक अनावरण कार्यक्रमाची उत्साहपूर्ण सुरुवात पालघर जिल्ह्यातून करण्यात आली. ही राज्यस्तरीय स्पर्धा दिनांक १७, १८ आणि १९ एप्रिल रोजी नेरूळ जिमखाना, नेरूळ येथे पार पडणार असून यामध्ये मुलींचे पाच आणि मुलांचे आठ संघ सहभागी होणार आहेत.

संपूर्ण महाराष्ट्रात या स्पर्धेचा उत्साह वाढविण्यासाठी चषक अनावरणाचा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला असून, त्याची पहिली पायरी क्रेडो वर्ल्ड स्कूल, सावटा (डहाणू) येथून पार पडली. त्यानंतर हा चषक पूज्य आचार्य भिसे विद्यालय, कासा येथे आणण्यात आला. यावेळी विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीम आणि पालघरच्या पारंपरिक तारपा नृत्याने उपस्थितांचे मन जिंकले.चषकाचे अनावरण संस्थेचे सचिव पांडुरंग बेलकर आणि कासा ग्रामपंचायतीचे उपसरपंच हरेश मुकणे यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोसिएशनचे विभागीय सचिव धनंजय वनमाळी, पूज्य आचार्य भिसे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनघा गायकवाड, मिंटोनेट+ व्हॉलीबॉल अकॅडमीचे सहसंस्थापक विजयन मेनन, पालघर जिल्हा व्हॉलीबॉल असोसिएशनचे सहसचिव कुंजल संखे, विभागीय सचिव रोहित बारी, डहाणू तालुका व्हॉलीबॉल असोसिएशनचे उपाध्यक्ष विपुल राऊत यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.या चषकाचा पुढील प्रवास नागपूर, धाराशिव, कोल्हापूर, पुणे आणि मुंबई अशा प्रमुख शहरांमध्ये होणार असून, राज्यभरातील खेळाडूंमध्ये स्पर्धेबाबत उत्सुकता निर्माण करण्याचा यामागील उद्देश आहे. या उपक्रमामुळे ग्रामीण व शहरी भागातील युवा खेळाडूंना व्यासपीठ मिळण्यास मदत होणार असून, व्हॉलीबॉल खेळाच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# अवसरी येथे श्री हनुमानाची यात्रा ढोल ताशांच्या गजरात उत्साहात साजरी

दैनिक वादळ वार्ता

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्यातील अवसरी येथे नवसाला पावणाऱ्या श्री हनुमानाची यात्रा मोठ्या उत्साहात व आनंदाच्या वातावरणात पार पडली. पारंपरिक पद्धतीने ढोल-ताशांच्या गजरात हनुमानाच्या भव्य मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली. ग्रामस्थांनी गुलालाची उधळण करत जल्लोषात सहभागी होत ही मिरवणूक सुमारे पाच तास सुरू होती. यात्रेसाठी अवसरी पंचक्रोशीतील भाविक तसेच पाहुणे मोठ्या संख्येने उपस्थित होते.या यात्रेची सुरुवात दि. ३१ मार्च रोजी झाली. दररोज पहाटे चार वाजल्यापासून मंदिरात हरिपाठाने कार्यक्रमास प्रारंभ होत होता. यामध्ये ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोजन करण्यात आले होते. सात दिवस चालणाऱ्या या यात्रेत दररोज कीर्तन सेवा आयोजित करण्यात आली होती.या कीर्तन सेवेत गणेश कीर्तने, तुकाराम काळकुटे, संतोष मगर, श्रीकांत गलांडे, प्रमोद शिंदे, सुनील जगताप, कृष्णा चौवरे, नंदराज पाटील, ज्ञानेश्वर कदम (छोटे माऊली) यांनी कीर्तनाद्वारे भाविकांना मार्गदर्शन केले.कीर्तनासाठी दिलीप कवितके, दादासाहेब भोसले, रामदास तावरे, श्रीराम मोरे, गोरख साळुंखे, ज्ञानदेव मगर, दत्तात्रय शिंदे, अरुणा कवडे, अंकुश काटे, संदिपान घनवट, बाळासाहेब कुलकर्णी, दत्तात्रय शिंगटे यांनी



सहकार्य केले.यात्रेदरम्यान सात दिवस अन्नदानाचा कार्यक्रमही राबविण्यात आला. यामध्ये संदिपान सरडे, संतोष कांबळे, उत्तम कवितके, मारुती कवितके, संभाजी कवितके, युवराज गायकवाड, शिवाजी तरंगे, नाना घळके, धनाजी सावंत, सिताराम जाधव, तानाजी गायकवाड, पृथ्वीराज गायकवाड, अभंग पेंडवळे, संदेश शिंदे, हनुमंत जगताप, भीमराव झगडे, किसन कवितके, बाळासो शिंदे यांनी योगदान दिले.कार्यक्रमाचे व्यासपीठ संचालन सुनील जगताप, दादासाहेब भोसले आणि रामदास तावरे यांनी केले. यात्रेच्या निमित्ताने ग्रामस्थांच्या मनोरंजनासाठी लोकनाट्य, वाद्यवृंद तसेच जंगी कुस्त्यांचेही आयोजन करण्यात आले होते.श्री हनुमानाची संपूर्ण यात्रा शांततेत पार पडावी यासाठी हनुमान यात्रा समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# दोन मैत्रिणींची एकाचवेळी चंद्रपूर पोलिस दलात निवड; जिद्द आणि मेहनतीची यशोगाथा

दैनिक वादळ वार्ता

**चिमूर । प्रतिनिधी**

सन २०२५-२६ मध्ये झालेल्या पोलिस भरती प्रक्रियेत चिमूर तालुक्यातील दोन मैत्रिणींनी एकत्रित यश संपादन करत चंद्रपूर पोलिस दलात स्थान मिळवले आहे. मोनिका गीता मोहन ठवरे आणि ऋतुजा अंकुश गंधारे या दोघींची नुकतीच निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.दोघीही मैत्रिणींनी सुरुवातीपासून एकत्र सराव करत धावण्याचा कसून सराव केला. या कालावधीत मनोज तुमराम व राकेश मालोदे यांनी त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले. त्यांच्या या परिश्रमाचे फळ म्हणून दोघीही शारीरिक चाचणीत यशस्वी ठरल्या.यानंतर लेखी परीक्षेसाठी त्यांनी



चिमूर येथील शहीद वाचनालयात एकत्रित अभ्यास केला. प्रतिकूल परिस्थिती असूनही त्यांनी हार न मानता अथक परिश्रम घेतले. घरची आर्थिक परिस्थिती कठीण असतानाही दोघी चिमूर येथे राहून अभ्यास करत होत्या.'आई-वडिलांचे दिवस बदलायचे' हा दृढ निश्चय मनात ठेवून त्यांनी सातत्याने अभ्यास केला आणि नुकत्याच जाहीर झालेल्या निवड यादीत दोघींची नावे झळकली.निकाल लागल्यानंतर कुटुंबीय, मित्र-मैत्रिणी यांनी आनंद व्यक्त केला. शहीद वाचनालयातील विद्यार्थ्यांनी दोघींचा सत्कार करून बँडच्या तालावर आनंदोत्सव साजरा केला.या यशामुळे परिसरातील इतर तरुणींनाही प्रेरणा मिळत असून जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर यश मिळवता येते, हे या दोघींनी सिद्ध करून दाखवले आहे.

# वाय.सी.कॉलेज स्पर्धा परीक्षा केंद्राचा विद्यार्थी महावीर रानगट यांची एमपीएससीतून कर सहाय्यक पदावर निवड

दैनिक वादळ वार्ता

**सोलापूर । प्रतिनिधी**

एमपीएससी परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत वाय. सी. कॉलेज स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी महावीर रानगट यांची कर सहाय्यक पदावर निवड झाली आहे. राज्यात २९व्या क्रमांकाने उत्तीर्ण होत त्यांनी यश संपादन केले असून, त्यांच्या या कामगिरीमुळे महाविद्यालय व स्पर्धा परीक्षा केंद्राचा नावलौकिक अधिक उंचावला आहे. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.महावीर रानगट यांच्या या यशाबद्दल कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ज्ञानदेव म्हस्के यांच्या हस्ते त्यांचा विशेष सत्कार करण्यात



आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे तसेच डी. जी. कॉलेजचे प्राचार्य डॉ. अरुण आंधळे उपस्थित होते.या प्रसंगी स्पर्धा परीक्षा केंद्राचे संचालक डॉ. गणेश कोकाटे, समन्वयक प्रा. सुशील यादव, प्रा. डॉ. बिपिन शिंदे, ग्रंथपाल नितीन हांडे, ऋषिकेश कराळे, किरण माने, शंभूराजे, राजेश गायकवाड तसेच केंद्रातील सहकारी उपस्थित होते. सर्वांनी महावीर रानगट यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.महावीर रानगट यांनी आपल्या यशाचे श्रेय स्पर्धा परीक्षा केंद्राचे मार्गदर्शन, नियमित अभ्यास व प्राध्यापकांचे सहकार्य यांना दिले. त्यांनी आपले संपूर्ण शिक्षण तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी 'कमवा व शिका' योजनेतून पूर्ण केली असल्याने त्यांचे यश अधिक प्रेरणादायी ठरले आहे.त्यांच्या या यशामुळे इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले असून, स्पर्धा परीक्षा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे. महावीर रानगट यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशन पदाधिकाऱ्यांचा बीड येथे सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**बीड । प्रतिनिधी**

वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालय, बीड येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना विद्यार्थी दशेतच वृत्तपत्र प्रतिनिधी, विभागीय संपादक तसेच डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशनसारख्या नामांकित संघटनेत प्रमुख पदांची जबाबदारी मिळाल्याने महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने त्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.

महाविद्यालयात एमएएमसीजे शिक्षण घेत असलेले प्रथम वर्षाचे विद्यार्थी गणेश शिंदे यांची दैनिक संचार वृत्तपत्रासाठी बार्शी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाली. तसेच निलेश उबाळे यांची दैनिक सह्याद्रीचा राखणदार वृत्तपत्रासाठी विभागीय संपादक म्हणून, तर अमीन गोरे यांची बार्शी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले.याचबरोबर गणेश शिंदे यांची डिजिटल मीडिया पत्रकार असोसिएशनच्या अध्यक्षपदी, निलेश उबाळे यांची सचिवपदी, तर अमीन गोरे यांची सहसचिवपदी निवड झाल्याबद्दल महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा विशेष गौरव करण्यात आला.या कार्यक्रमावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य शेख, जवळे, पत्रकारिता विभाग प्रमुख पटवारी, तसेच ग्रंथालय विभागाचे गाढवे व इतर शिक्षकवृंद उपस्थित होते.यावेळी शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करताना योग्य शिक्षण आणि चांगल्या पत्रकारितेच्या बळावर विद्यार्थी दशेतच प्रतिष्ठित वृत्तपत्रांमध्ये काम करण्याची संधी मिळणे ही अभिमानास्पद बाब असल्याचे सांगितले. तसेच समाजाचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेची जबाबदारी जपत निष्पक्ष, सत्य आणि जनहिताची पत्रकारिता करण्याचे आवाहन करण्यात आले.निवड झालेल्या विद्यार्थ्यांनीही महाविद्यालयाने दिलेल्या सन्मानामुळे अधिक जबाबदारीची जाणीव झाल्याची भावना व्यक्त केली. त्यांच्या या यशाबद्दल महाविद्यालय परिसरासह बीड जिल्ह्यात विविध स्तरांतून कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077